# ई - पोलीस पत्रिका

दि.१८/१०/२०२३ अनु.क्र.१८६

## (अमरावती शहर पोलीसांची२०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशीमित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्तव तणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्धकठोरकारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्यकरू.

## भाग-१
## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/पशा-१/MIA/F&T/११०५२/२०२३ अमरावती शहर दिनांक ०४/१०/२०२३**

**संदर्भ :-**विशेष पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे यांचे बिनतारी संदेश O.NO. MIA/TRG/OCTOBER/F&T/COURSE NO -१३/२०२३/३६६८, दिनांक २५.०९.२०२३

**विषय :-** Fundamental & Terrorism, Course No. ०४/२३ या प्रशिक्षणासाठीपोलीस अधिकारीपाठविणेबाबत.

### आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे **Fundamental & Terrorism** या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे. अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद अधिकारी यांची सदरचे प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात येत आहे.

| प्रशिक्षण केंद्राचे नाव | प्रशिक्षण दिनांक | अधिका-याचे नांवे | नेमणुक |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | ३०.१०.२०२३ ते ०३.११.२०२३ | श्री. विनोद चव्हाण पोलीस उपनिरीक्षक | QRT, अमरावती शहर |
| | | श्री. राजेश पुरी, पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर |

उपरोक्त प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण शुल्क प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर केलेल्या मागणी प्रमाणे देयके अदा करण्यात येईल.

**प्रशिक्षण केंद्रात जाण्यापुर्वी त्याबाबतचे नियम व अटी खालील प्रमाणे :-**

१. उपरोक्त पोलीस अधिकारी यांनी दि.२९.१०.२०२३ रोजी २०.०० वाजता चे आत प्रशिक्षण स्थळी पोहचावे.

२. उपरोक्त पोलीस अधिकारी यांनी UNIFORM, I-CARD, SPORTS DRESS, SPORT SHOES, RELIEVING MEMO इत्यादी साहित्य सोबत नेणे आवश्यक आहे.

३. उशिरा पोहचणा-या अधिका-यांना प्रशिक्षणास ॲडमिशन मिळणार नाही व त्यांना परत करण्यात येईल. तसेच प्रशिक्षणा दरम्यान कोणतेही रजा किंवा परवानगी मिळणार नाही.

४. उपरोक्त प्रशिक्षणार्थीनी वैद्यकीय आपतकालीन परिस्थिती करीता महाराष्ट्र कुटूंब कल्याण आरोग्य योजना कार्ड सोबत नेणे आवश्यक आहे.

# भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमी करणे

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/कसुरी/अं.आदेश/सपोनि-संदीप हिवाळे+३/११२०१/२०२३ अमरावती शहर दिनांक ०९/१०/ २०२३**

**कसुरदाराचे नाव** :- **१)** सपोनि संदिप हिवाळे, नेमणूक - पोलीस स्टेशन नागपूरी गेट, अमरावती शहर, **२)** सपोउपनि/६४८ राजू मोहोड, **३)** पोहवा/८७१ राजेश बोरकुटे, **४)** पोशि/१४७ प्रविण उमाळे सर्व नेम. पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही कसूरदार १) सपोनि संदिप हिवाळे, नेमणूक - पोलीस स्टेशन नागपूरी गेट, अमरावती शहर, २) सपोउपनि/६४८ राजू मोहोड, ३) पोहवा/८७१ राजेश बोरकुटे, ४) पोशि/१४७ प्रविण उमाळे सर्व नेम. पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे कर्तव्यार्थ असतांना तुमची दिनांक ०६/०६/२०२३ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृहातील शिक्षाधिन न्यायबंदी क्र. सि.६११७ नामे गणेश देविदास शिंदे रा. शिवाजी नगर भंडारवाडा रुम नं. ११६ सायन, मुंबई-२२, ह.मु. बेडेकर बिल्डींग रुम नं. १०१, अगसन रोड, दिवा पुर्व ठाणे यास डी.सी.बि. सि.आय.डी. युनिट ए.सी.ई. मुंबई अपराध क्र. २४८/२०२२ कलम ३८५,४५२,५०६,३४ भादवि या गुन्हयात कोर्ट पेशिकरीता अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, ईसप्लांडा, कोर्ट क्र. ३७ मुंबई या कोर्टात दिनांक ०७/०६/२०२३ रोजी हजर करण्याकरीता एस्कॉर्ट डयुटी नेमण्यात आली होती. तुम्ही दिनांक ०६/०६/२०२३ रोजी नमुद न्यायाधिन बंदी यास मध्यवर्ती कारागृह अमरावती येथून ताब्यात घेवून रेल्वेने मुंबई येथे गेले. व दिनांक ०७/०६/२०२३ रोजी अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, ईसप्लांडा, कोर्ट क्र. ३७ मुंबई या कोर्टात कोर्ट पेशी करीता हजर केले. आरोपीची कोर्ट पेशी करुन तुम्ही मुंबई ते अमरावती एक्सप्रेसने अमरावती येथे परत येत असतांना नाशिक रोड, रेल्वे स्टेशन दरम्यान आरोपीने हातातील हथकडीमुळे काचा पडत असून हात दुखत आहे तसेच पोट दुखत आहे असे सांगीतल्याने तुम्ही त्याचे हातातील हथकडी सोडून त्यास बाथरुमला नेले व बाथरुम मधून परत आल्यावर त्यास हथकडी न लावता सिटवर बसविले. रात्रीचे दरम्यान तुम्हा सर्व गार्ड मधील अधिकारी/अंमलदारांना झोप लागल्यामुळे आरोपीने या संधीचा फायदा घेवून मनमाड येथे गाडी थांबली असता ००.१० ते ००.४० वा. दरम्यान आरोपी पळून गेला. तुम्हास जाग आल्यानंतर तुम्ही चालत्या गाडीत आरोपीचा शोध घेतला परंतू आरोपी मिळून आला नाही. गार्ड प्रमुख सपोनि संदिप हिवाळे यांनी शेगांव येथे गाडी थांबल्यानंतर लोहमार्ग पोलीस स्टेशन शेगांव येथे तक्रार दिली. त्यावरुन लोहमार्ग पोलीस स्टेशन शेगांव येथे अप.क्र. १७४/२०२३ कलम २२४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यांत आला आहे.

१. न्यायाधिन बंदी हा सुरक्षागार्डचे अभिरक्षेत असतांना तुम्ही सर्वांनी सुरक्षेतेच्या दृष्टीने आरोपीचे चारही बाजुने संतर्क राहुन डयुटी करणे आवश्यक होते. परंतु तुम्ही सर्व गार्ड मधील अधिकारी/अंमलदारांनी सतर्क राहुन डयुटी न केल्यामुळे न्यायाधिन बंदी यास पळून जाण्यास संधी प्राप्त झाली.

तुम्ही सर्व पोलीस विभागात अत्यंत जबाबदार पदावर काम करीत असून तुम्हास आपल्या कर्तव्याप्रती कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून येत नाही. प्रस्तूत प्रकरणी तुमची प्राथमिक चौकशी केली असता तुम्ही वरील प्रमाणे कसूरी केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. तुम्ही पोलीस विभागात अत्यंत जबाबदार पदावर काम करीत असून शिस्तप्रिय पोलीस खात्याला न शोभणारे वर्तन केले आहे.

उपरोक्त कसुरी बाबत प्रकरणी तुम्हाला मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **देय वार्षीक वेतन वाढ २ (दोन) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये?** म्हणून कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक २२/०७/२०२३ रोजी स्विकारुन त्यावर आपले स्पष्टीकरण सादर केले. तत्पुर्वी तुम्हास दिनांक ०४/१०/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता ते समाधानकारक दिसून आले नाही परंतु आपणास पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरी प्रकरणी १) सपोनि संदिप हिवाळे, नेमणूक - पोलीस स्टेशन नागपूरी गेट, अमरावती शहर, २) सपोउपनि/६४८ राजू मोहोड, ३) पोहवा/८७१ राजेश बोरकुटे, ४) पोशि/१४७ प्रविण उमाळे सर्व नेम. पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **पुढील देय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता** (अपरिणामकारक) शिक्षेबाबतचे अंतीम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयोत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील ७० (१) नुसार दिनांक १३/०६/२०२३ ते १४/०७/२०२३ पावेतो निलंबन कालावधी हा (**As Such**) **"जसाचे तसा"** करण्यात येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

## सेवानिवृत्त

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/नि.व.सेवानिवृत्त/११२५६/२०२३ अमरावती शहर दिनांक १०/१०/ २०२३**

संदर्भ :-१) या कार्यालयाचे अधीसुचना क्र.पोआअ/आस्था-वेनिलि/नि.व.सेवानिवृत्त/८२८६/२०२०, दि.२२.१२.२०२०

२) याकार्यालयाचे अधीसुचना क्र.पोआअ/आस्था-वेनिलि/नि.व.सेवानिवृत्त/ ४०२८/२०२२, दि.०८.०४.२०२२

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर, आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) आणि महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :- सेनिवे/१०९९/३४/सेवा-४, दिनांक ०२.०२.१९९९ अन्वये **दि.३१.१०.२०२३** चे मध्यान्होत्तर **पासून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात येत आहे**.

| अ.क्र. | अंमलदाराचे नाव | पदानाम व बक्कल क्रमांक | नेमणुक | जन्म दिनांक | वयाची ५८ वर्ष पुर्ण केल्याचा दिनांक | नियत वयोमान सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जगन्नाथ कृष्णराव लुटे | पोलीस हवालदार, बक्कल क्रमांक ९२५ | मोटार परिवहन विभाग | ०४/१०/१९६५ | ०४/१०/२०२३ | ३१/१०/२०२३ |
| २. | सुधाकर गोविंदराव माहुरे | सहायक पोलीस उपनिरीक्षक, बक्कल क्रमांक ८१९ | पोलीस मुख्यालय | २६/१०/१९६५ | २६/१०/२०२३ | ३१/१०/२०२३ |
| ३. | प्रफुल्ल मधुकर देशमुख | सहायक पोलीस उपनिरीक्षक, (तांत्रीक) | मोटार परिवहन विभाग | २६/१०/१९६५ | २६/१०/२०२३ | ३१/१०/२०२३ |

1/- वरिल नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक ३१.१०.२०२३ चे मध्यान्होत्तर पासून प्रभारी पोलीस अधिकारी यांनी शासकिय सेवेतुन मुक्त करावे.

२/- प्रभारी पोलीस अधिकारी यांनी सदर पोलीस अंमलदार यांच्या ताब्यातील शासकिय निवासस्थाने त्वरीत रिक्त करण्याची कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३/- वरिल नमूद पोलीस अंमलदार यांना शासकिय सरंजाम,किट, ओळखपत्र पोलीस मुख्यालयातील वस्त्र भांडारमध्ये जमा करुन प्रभारी पोलीस अधिकारी यांनी तसे या कार्यालयास कळवावे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

### वेतन निश्चितीती

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/सुधा.किमान वेतन/११२३०/२०२३ अमरावती शहर दिनांक ०९/१०/२०२३**

### आदेश क्र.०१

शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर-११२२/प्र.क्र.६/सेवा-९ दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ नुसार सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना ज्या पदावर दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर या नियमांच्या जोडपत्र तीन नुसार सेवाप्रवेश वेतन अनुज्ञेय ठरते, अशा पदांवर दिनांक ०१ जानेवारी २००६ पुर्वी नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या आणि दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी पोटनियम (१) कलम (अ) अन्वये वेतननिश्चिती केलेल्या शासकिय कर्मचा-याचे वेतन, सरळसेवा नियुक्तींसाठी जोडपत्र तीन मध्ये विहिती केलेल्या सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी निश्चिती होत असेल तर, ते दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून उंचावून देण्यात यावे कि, ज्यामुळे अशा सेवाप्रवेश वेतनापेक्षा ते कमी असणार नाही असे नमूद करण्यात आले आहे.

**त्याअनुषंगाने पोहवा/१०५, भारत श्रवण वानखडे,नेमणूक पो.स्टे.राजापेठ,अमरावती शहर,** यांची शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|
| पोलीस शिपाई | रु.५२००-२०२००/- | रु.२०००/- |

| विद्यमान वेतन व दिनांक | | | सुधारीत देय वेतन व दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | |
| | वेतन बँड | ग्रेड वेतन | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| ०१/०१/२००६ | ५९६०/- | रु.२०००/- | ०१/०१/२००६ | रु. ६४६०/- **शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ नुसार अनुज्ञेय वेतन** | रु.२४००/- |
| २६/०६/२००६ | रु.६४६०/- **शा.नि.वित्त विभाग दि.०९.०२.२०१६ मधील तरतुदीनुसार कनिष्ठ कर्मचारी यांचे वेतनाइतके उंचावून दिलेले वेतन.** | रु.२०००/- | -- | -- | |
| ०१/०७/२००६ | -- | | ०१/०७/२००६ | रु.६४६०+२६०=६७२०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००७ | रु.६४६०+२६०=६७२०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००७ | रु.६७२०+२७०=६९९०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००८ | रु.६७२०+२७०=६९९०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००८ | रु.६९९०+२७०=७२६०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००९ | रु.६९९०+२७०=७२६०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००९ | रु.७२६०+२८०=७५४०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१० | रु.७२६०+२८०=७५४०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१० | रु.७५४०+२९०=७८३०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०११ | रु.७५४०+२९०=७८३०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०११ | रु.७८३०+३००=८१३०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१२ | रु.७८३०+३००=८१३०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१२ | रु.८१३०+३१०=८४४०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१३ | रु.८१३०+३१०=८४४०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१३ | रु.८४४०+३२०=८७६०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१४ | रु.८४४०+३२०=८७६०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१४ | रु.८७६०+३३०=९०९०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.८७६०+३३०=९०९०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१५ | रु.९०९०+३४०=९४३०/- | रु.२०००/- |

## आदेश क्र.(२)

शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ दि.०१.०१.२०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे पदाची विद्यमान वेतन संरचना वेतन बँड+ग्रेड वेतन नुसार सुधारीत वेतन संरचना (वेतन मॅट्रीक्स) मधील वेतन स्तर मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | पे मॅट्रीक्स |
|---|---|---|
| पोलीस शिपाई | एस-७ | रु.२६४००-८३६००/- |
| पोलीस नाईक | एस-८ | रु.२५५००-८११००/- |

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती |
|---|---|---|---|
| ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन ११०९० x२.५७ = २८५०१.३/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन<br>रु.२९३००/- एस-७ | ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन ११४३० x२.५७ = २९३७५.१/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन<br>रु.३०२००/- एस-७ |
| ०१/०१/२०१६ | सुआप्रयो अंतर्गत १० वर्ष नियमीत सेवा दि.०४.०३.२०१५ रोजी पुर्ण झाल्याने पहिला लाभ दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय<br><br>सुआप्रयो अंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याने पुर्वीच्या पदामध्ये मानीव वेतनवाढ रु. ३०२००/- एस-७<br><br>नियम ११ (१) (अ) नुसार पदोन्नतीच्या (पोना) पदाची वेतननिश्चिती. रु.३०५००/- एस-८ | ०१/०१/२०१६ | सुआप्रयो अंतर्गत १० वर्ष नियमीत सेवा दि.०४.०३.२०१५ रोजी पुर्ण झाल्याने पहिला लाभ दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय<br><br>सुआप्रयो अंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याने पुर्वीच्या पदामध्ये मानीव वेतनवाढ रु. ३११००/- एस-७<br><br>नियम ११ (१) (अ) नुसार पदोन्नतीच्या (पोना) पदाची वेतननिश्चिती. रु.३१४००/- एस-८ |
| ०१/०७/२०१६ | रु. ३१४००/- एस-८ | ०१/०७/२०१६ | रु. ३२३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१७ | रु.३२३००/- एस-८ | ०१/०७/२०१७ | रु.३३३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१८ | रु.३३३००/- एस-८ | ०१/०७/२०१८ | रु.३४३००/- एस-८ |
| २९/०६/२०१९ | रु.३३३००/- एस-८<br>पोना पदावर नियमीत पदोन्नती परंतू कालबद्ध पदोन्नतीचा लाभ घेतल्याने पुन्हा वेतननिश्चितीची आवश्यकता नाही. | २९/०६/२०१९ | रु.३४३००/- एस-८<br>**पोना पदावर नियमीत पदोन्नती** परंतू कालबद्ध पदोन्नतीचा लाभ घेतल्याने पुन्हा वेतननिश्चितीची आवश्यकता नाही. |
| ०१/०७/२०१९ | रु.३४३००/- एस-८ | ०१/०७/२०१९ | रु.३५३००/- एस-८ |
| ०१/०७/२०२० | रु.३५३००/- एस-८ | ०१/०७/२०२० | रु.३६४००/- एस-८ |
| ०१/०७/२०२१ | रु.३६४००/- एस-८ | ०१/०७/२०२१ | रु.३७५००/- एस-८ |
| ०१/०७/२०२२ | रु.३७५००/- एस-८ | ०१/०७/२०२२ | रु.३८६००/- एस-८ |
| ०१/०७/२०२३ | रु.३८६००/- एस-८ | ०१/०७/२०२३ | रु.३९८००/- एस-८ |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतनिश्चितीमुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी वेतनात रोखीन अदा करण्यात यावी. तसेच सदरची वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथक यांचे अतिम तपासणीचे अधीन राहून करण्यात आली असून भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम त्यांचेकडून वसूल करण्यात येईल.

## संकीर्ण

**१.पोआअ/प्रलि-पशा/वि.अ.राजीनामा/१०९८६/२०२३ अमरावती शहर दिनांक ०३/१०/२०२३**

**संदर्भ** :- श्री. पियुष पाचकवडे, विधी अधिकारी, नेमणुक सहा. पोलीस आयुक्त कार्यालय, राजापेठ विभाग यांचा एक महिन्यापूर्वी पुर्व सुचना ( नोटीस ) दिनांक 06/09/2023

**विषय** :- विधी अधिकारी या पदाचा राजीनामा स्विकारण्याबाबत.

*****

**आ दे श**

श्री. पियुष अरुण पाचकवडे, विधी अधिकारी, नेमणुक सहायक पोलीस आयुक्त कार्यालय, राजापेठ विभाग, अमरावती शहर यांची या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोआअ/प्रलि-पशा/वि.अ./ नेमणुक/ 2023-7091 दिनांक 20/06/2023 अन्वये कंत्राटी पध्दतीने निव्वळ 11 महिन्याकरीता दिनांक 26/06/2023 ते 25/05/2024 पर्यंत दरमहा एकत्रित मानधन रु. 20,000/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रु. 3,000/- एवढया मानधनावर तात्पुरते स्वरुपात विधी अधिकारी, या पदावर दुसरी संधीवर नेमणुक करण्यात आली होती.

श्री. पियुष अरुण पाचकवडे, विधी अधिकारी, यांनी दिनांक 06/09/2023 अन्वये विधी अधिकारी या पदाचा राजीनामा पुर्वसुचना ( नोटीस ) दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, गृहविभाग, शासन निर्णय, क्रमांक :एसपीपी 2005/ प्र.क्र.247/ पोल-10, दिनांक 15 सप्टेंबर 2006 अन्वये नियुक्तीचे वेळी संबधिताबरोबर विहीत प्रपत्र परिशिष्ट ब मध्ये करारनाम्यातील अनुक्रमांक 8 मध्ये एक महिन्यापूर्वी पूर्व सुचना ( नोटीस ) देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सदर विधी अधिकारी यांची एक महिन्यापूर्वी पुर्व सुचना ( नोटीस ) या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

त्या अनुषंगाने **श्री. पियुष अरुण पाचकवडे यांचा दिनांक** 06/10/2023 **पासुन विधी अधिकारी, या पदाचा राजीनामा मंजुर** करण्यात येत आहे.

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस